3/2015

2015-16 (ST)

मनुष्याणाम कृतीरर्थः।

# अर्थमती २०१५-१६

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | **संपूर्ण लेख** | |
| १. | पं.जवाहरलाल नेहरू आणि नियोजनाची पूर्वपीठिका | डॉ. रामदास माहोरे |
| २. | भारतीय आर्थिक नियोजन व पंडित नेहरूंच्या विचारांचा प्रभाव | डॉ. तेजस्विनी बी. मुडेकर |
| ३. | पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन | प्रा. डॉ. सौ. पाटील पार्वती भगवान |
| ४. | पंडित नेहरू व भारतीय आर्थिक नियोजन | डॉ संतोष कुटे |
| ५. | पंडित नेहरू व भारतातील नियोजन | डॉ. समाधान पाटील |
| | **गोषवारा** | |
| १. | पंडीत जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिकनियोजन | प्रा. डॉ. आर.के. शिंदे |
| २. | भारतीय नियोजनात औद्योगिक विकासाबाबत नेहरूंचे योगदान | डॉ. सोनल मामराज जनबंधु |
| ३. | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे आर्थिक विचार | प्रा. डॉ. कदम संभाजी किसन |
| ४. | नेहरूंचे विचार : तत्कालीन परिस्थितीच्या परिणामांची निष्पत्ती | प्रा. राजश्री आनंद राजभोग |
| ५. | पंडीत नेहरू यांचे आर्थिक नियोजनापाठीमागील वैचारिक अधिष्ठान | प्रा. डॉ. शकुंतला पाटील |
| ६. | पंडित जवाहरलाल नेहरूंच्या योजनांसंबंधी धोरण व कार्यक्रमावरील अर्थशास्त्रीय टीकेचा आढावा | वसंत नथू हिस्सल |
| ७. | पं. नेहरू कालीन तीन पंचवार्षिक योजनांचे मूल्यमापन | डॉ. शंकर मारोती सावंत |
| ८. | पंडीत नेहरुंचा समाजवाद आणि तूटीच्या अर्थभरण्याचे महत्व | प्रा. डी. जी. धट |
| ९. | नेहरूकालीन योजनांची उद्दिष्टे व वित्तीय साधनसामुग्रीची उपलब्धता | शेजूळ भानुदास कान्हू, नाळे सुरेश सिताराम |
| १०. | पंडीत नेहरू प्रणित आर्थिक नियोजनाची संकल्पना आणि तत्कालीन पंचवार्षीक योजनांचा आढावा | प्रा.डॉ.वाणी निता सुधाकर |
| ११. | पंडित नेहरूंचे स्वयंपूर्णतेचे तत्त्व | डॉ. उमेश मधुकर राजदेरकर |
| १२. | आर्थिक नियोजन ! नेहरू आणि दलित | सहा. प्रा. लक्ष्मण शामराव बैसाणे |
| १३. | पंडीत नेहरूंच्या नियोजनामुळे भारतीय शेतीचा झालेला विकास | प्रा.डॉ.आर.के.दातीर, प्रा.के.डी.जाधव |
| १४. | आर्थिक नियोजन अपरिहार्यता आणि मूल्यमापन | प्रा. सुजाता सुरेश आवटी |
| १५. | पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन | प्रा. राठोड मदनसिंग सुपडू |
| १६. | पंडित जवाहरलाल नेहरू व भारतीय आर्थिक नियोजन | डॉ. प्रा. बाळकृष्ण दत्तात्रय कुलकर्णी |
| १७. | पंडीत जवाहरलाल नेहरू व आर्थिक नियाजेन | डॉ. नामदव निवत्ती मुंढे, प्रा. वडगावे व्यंकट जनार्दन |


330



Scanned by TapScanner

# ४ पंडित नेहरू व भारतीय आर्थिक नियोजन

डॉ संतोष कुटे
कला व विज्ञान महीला
महाविद्यालय मेहकर

**प्रस्तावना :**

कोणत्याही विकासाचा आराखडा हा लोकशाहीने स्थापन केलेल्या समता आणि न्यायावर आधारलेला असतो. उदारमतवादी लोकशाहीने गरीबी अधिक असलेल्या राज्याचा विकास शक्य नसतो. भारतासारख्या गरीबी अधिक असलेल्या राज्यामध्ये उदारमतवादी लोकशाहीने विकास शक्य नाही. हे ओळखूनच पं. नेहरूंनी भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी समाजवादी लोकशाही व्यवस्थेचा अवलंब केला. पं. जवाहरलाल नेहरूंना भारताचा सर्वांगीन विकास साधायचा होता.त्यांना आधिुनिक भारत निर्मितीचा ध्यास होता. त्यासाठी त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला आणि त्या दिशेने त्यांनी पाऊले उचलीत २७ डिसेंबर १९५४ ला संसदेमध्ये त्यांनी जाहीर केले की भारताची अर्थव्यवस्था मिश्र अर्थव्यवस्था राहील. अखील भारतीय काँग्रेसच्या ५५ व्या अधिवेशनात ठराव ही संमत केला. पं. जवाहरलाल नेहरूंना विश्वास होता की मिश्र अर्थव्यवस्थाच भारताच्या विकासास पोषक ठरेल. भारताची मागील ६० वर्षाची प्रगती बघीतल्यास हे स्पष्ट होते. मिश्र अर्थव्यवस्थेमुळे सार्वजनिक उद्योगधंदे सुरू करता आली आणि लोकांना पायाभुत सुविधा उपलल्ध करून देता आले.

कार्ल मार्क्स हे इतिहासातील पहिले युगपुरूष होउन गेले की ज्यांनी हजारो वर्षे पशुतुल्य जीवन जगणाऱ्या तळागाळातील शोषित मानवाला मध्यवर्ती कल्पून मानवी समाजाची अमुलाग्र संपूर्ण नवरचना करण्याचा क्रांतीकारक विचार मांडला समाजाच्या परिवर्तनाचा प्रामुख्याने आर्थिक परिवर्तनाचा शास्त्रीय समाजवाद हा नवा मार्ग शोषित समाजाला उपलल्ध झाला. आणि मानवी इतिहासात प्रथमच पददलीत शोषित मानवाच्या ऐहिक मुक्ति आंदोलन व्यापक प्रमाणावर सुरू करण्याचे कार्य गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांनीच केले.

मात्र भारतीय भांडवलदारांनी अनिर्बंध व्यक्तीस्वातंत्र्याचा आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या राजगोपालाचारी यांच्यासारख्या राजकीय नेत्यांनी व बुध्दीमंतांनी नेहरू त्या समाजवादी धोरणाचा विरोध सुरू केला. समाजवाद म्हणजे सर्व लहान मोठ्या उद्योगधद्यांचे राष्ट्रीयकरण आणि खाजगी क्षेत्राची संपूर्ण हकालपट्टी असा सोयीस्कर अर्थ लावून हा विरोध सुरू करण्यात आला.

**संशोधनाचे उद्देश :**

१) समाजवाद आणि आर्थिक नियोजनाबाबत सद्यस्थिती स्पष्ट करणे -

२) पं. नेहरूंच्या आर्थिक नियोजन विषयक दृष्टिकोन अभ्यासने

**गृहितके :**

१) पं. नेहरूंच्या आर्थिक नियोजनाबाबत धोरणांमुळे भारताचा विकास शक्य झाला.

२) नेहरूंच्या आर्थिक धोरणामुळे आर्थिक समानता स्थापन्यास मदत झाली.

वरीलप्रमाणे गृहीतके निश्चीत करून प्रस्तुत शोध लेख त्याला अनुसरून तयार केला आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू हे मानवतेचे पुजारी असल्यामुळे ते साहजीकच समाजवादाकडे वळले. अखील भारतीय काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना त्यांनी प्रथम समाजवादाची घोषणा केली. ते पुढे असेही म्हणाले की, जागतीक समस्यांची गुरूकिल्ली फक्त समाजवादातच आहे.



Scanned by TapScanner

भारतातील आर्थिक विषमता व दारिद्र्य गरीबी समुळ नष्ट करण्यासाठी समाजवादी विचारसरणी स्विकारलीच पाहिजे. समाजवादाची तत्वता व सीध्दांतीक भुमिका न स्विकारता समाजवाद प्रत्यक्षात आणणे त्यांना महत्वाचे वाटले. आर्थिक पिळवणूक थांबवून समाजवादी समाजव्यवस्था स्थापन करणे समाजवादाला अभिप्रेत असते. पं. नेहरूंची भारताचे समाजवादी लोकशाहीचे प्रेरक हणून त्यांची भुमिका अत्यंत महत्वाची होती. जगामध्ये असणाऱ्या सर्व आर्थिक व राजकीय समस्या सोडविण्याचे एकमेव मार्ग म्हणून समाजवादाचा पूरस्कार त्यांनी केला.

**पं. नेहरूंवरील प्रभाव :**

पं. नेहरू कार्लमार्क्सच्या समाजवादाने प्रभावीत होते. कार्लमार्क्सने मानवतावादी दृष्टीने समाजवाद मांडलेला होता. म्हणून पं. नेहरूंना त्यांच्या सम ाजवादी विचाराचे आकर्षण होते. परंतु मार्क्सच्या समाजवादातील हिंसक मार्ग त्यांना मान्य नव्हता. इंग्लंडमधील शिक्षणाऱ्या काळात तेथील विचारवंतांनी नेहरूंच्या विचाराची बैठक तयार केली. प्रो. लॉस्की यांच्या विचारांचा आणि तत्त्व चिंतनाचा खोलवर ठसा नेहरूंच्या मनावर उमटला. त्यातुनच त्यांचा सम ाजवादाकडे कल गेला. युक्तीवाद व उदारमतवादाचा परिणाम ही पं. नेहरुंच्या मनावर झालेला होता. त्या व्यवस्थेतील भांडवलदार वर्गाकडून होणारे गरिबांचे, मजुरांचे शोषण त्यांना मान्य नव्हते. व्यक्ती राज्यासाठी नसून राज्य व्यक्तीसाठी आहे. या विचाराचे ते होते. महात्मा गांधीजीच्या अहिंसात्मक मार्गाने समाजवाद स्थापनेवर त्यांचा विश्वास होता. क्रांती आणि हिंसक मार्गाने समाजवाद स्विकारायला ते मुळीच तयार नव्हते. समाजवादाच्या माध्यमातून आर्थिक विषमता, गरीबी आणि दारिद्र्य त्यांना समुळ मिटवायचे होते. समाजवादाच्या प्रतीनेच भारतीयांच्या समस्यांचे स्पष्टीकरण करणे पुरेसे नाही तर ते स्पष्टीकरण भारतीय जनतेच्या भाषेतच करणे आवश्यक आहे. जनतेला त्यांच्या भाषेतच समाजवादाचा विचार पटवून दिला पाहिजे असे त्यांना वाटत होते. समाजवाद हा मला पसंत असलेला केवळ आर्थिक सिद्धांत नाही तो माझ्या बुद्धीला व अंतःकरणाला आव्हान करणारा महत्त्वपुर्ण संप्रदाय आहे. असे ते समाजवादा संबंधी म्हणत होते.

**औद्योगीकरणातून भारत विकास :**

पं. जवाहरलाल नेहरूंचा विकासाचा आराखडा तीन खांबावर आधारलेला होता. १. नियोजन, २. औद्योगीकरण व ३. कृषीविकास. मिश्र अर्थव्यवस्था स्विकारून सार्वजनिक क्षेत्राचा विकास घडवून आणणे, हा त्यांच्या मुख्य उद्देश होता. यासाठी त्यांनी नियोजनाला महत्त्व दिल्याचे दिसून येते. पं. जवाहरलाल नेहरूंनी आर्थिक नियोजनाचे युग सुरू केले. म्हणूनच पं. नेहरूंना नियोजनाचे जनक असे म्हणतात. भारतातील नैसर्गीक साधन सामुग्रीचा उपयोग नियोजनाचे होवू शकतो. यावर त्यांचा विश्वास होता. १९५० मध्ये नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली. पं. नेहरू हे नियोजन आयोगाचे प्रथम अध्यक्ष होते. नियोजनातून भारतात विकासाची प्रक्रिया त्यांनी सुरू केल्याची दिसून येते. पं. नेहरू औद्योगीकरणातून भारतीय अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण करू पाहत होते. त्यासाठी त्यांनी जलद गतीने औद्योगीकरण घडवून आणण्याचे धोरण स्विकारले होते. मोठे उद्योग व लहान उद्योग धंद्यामध्ये समन्वय ठेवल्याचे दिसून येते. स्वतंत्र भारतासाठी मोठे उद्योग धंदे उभारणे त्यांना आवश्यक वाटत होते. त्या व्यक्तीने त्यांनी धोरण ही स्विकारले खाजगी क्षेत्रातील उद्योग धंद्यानाही भारताच्या पायाभूत विकासासाठी त्यांनी चालना दिली. टाटा, दालमिया, सिंघानिया, बिर्ला सारख्या उद्योगपतींच्या साऱ्याने भारताचा विकास घडवून आणण्यावर त्यांचा भर होता हे दिसून येते.

**पं. नेहरूंचा कृषी विकास :**

औद्योगीकीकरण बरोबरच कृषी विकास घडवून आणण्यावर त्यांचा जोर होता. त्याकरीता पंचवार्षिक योजनेचा अवलंब त्यांनी केला. पहिल्या पंचवार्षिक योजनेत भाक्रा नांगल धरण, दामोदर खोरे योजना, हिराकुंड प्रकल्प होती घेण्यात आले. तसेच राष्ट्रीय उत्पन्नाचा दर ५% वरून ७% पर्यंत वाढविणे. हे त्यांचे उद्दिष्ट होते. जो पर्यंत कृषी विकास केला जात नाही तो पर्यंत भारतातील आर्थिक विकासाची योजना यशस्वी





Scanned by TapScanner

होवू शकत नाही. असे त्यांना वाटत होते म्हणून त्यांनी कृषी विकासावर भर पहिल्या पंचवार्षिक योजनेत दिला. भारताची ७०% जनता शेती हा व्यवसाय करीत असल्यामुळे कृषी विकास हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. हे ते ओळखून होते म्हणून त्यांनी त्या पद्धतीने विविध योजना आखल्या आणि त्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

भारत संपत्ती प्रधान देश असला तरी बहुसंख्य जनता दारिद्र्याने पिडीत होती. दारिद्र्य नष्ट करण्यासाठी पं. नेहरूंनी विकास योजना कार्यान्वीत करण्याचा प्रयत्न केला. भारताच्या आर्थिक सम स्वासाठी विकास योजनाद्वारा औद्योगीकरण व कृषी उत्पादनात वाढ असे कार्यक्रम अंमलात आणल्या गेले. आर्थिक स्वातंत्र्याखेरीज राजकीय स्वातंत्र्याला अर्थ राहत नाही. असे त्यांना मनोमनी वाटत असे. उत्पादन वाढीशिवाय गरीबी दारिद्र्य नाहीसे होणार नाही म्हणून त्यांनी नियोजन बद्ध रितीने विकास घडवून आणण्यावर भर दिला. नियोजनबबद्ध आर्थिक विकासाची कल्पना साम्यवादी शासनाच्या स्थापनेनंतर रशियात उदयाला आली होती.

अविकसीत समाजाचा वेगाने विकास घडवून आणण्यासाठी नियोजनाचा मार्ग स्विकारण्यात आला होता. नियोजन याचा अर्थ कोणत्या गोष्टीच्या उत्पादनावर भर द्यावयाचा त्याचा अग्रक्रम ठरविणे आणि त्यानुसार देशातील साधन सामुग्रीचा नियोजन करणे होय. भारतासारख्या असमतोल विकास झालेल्या देशात विकासामधील असमतोल दूर करणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून पं. नेहरूंनी १९५० मध्ये नियोजन आयोगाची स्थापना केली. घटक राज्यांना केंद्राकडून मिळणारी आर्थिक मदत ठरविण्यासाठी वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली. नियोजनबद्ध विकास धोरणामुळे अविकसीत भागांना विशेष स्वरूपाची आर्थिक मदत देता आली.

**पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आर्थिक विकास :**

पं. नेहरूंनी भारताचा आर्थिक विकास जलद गतीने व्हावा या करीता नियोजनाबरोबरच पंचवार्षिक योजना ही कल्पना स्विकारली. पायाभूत उद्योग निम ाण करावयाचे व त्या आधारावर पुढील औद्योगीक विकास व कृषीचा विकास साध्य करावयाचा अशी कल्पना त्यांनी स्विकारल्याचे दिसून येते. पहिल्या पंचवार्षीक योजनेची अमलंबजावनी १९५१-५२ म ध्ये सुरू झाली. या योजनेचा भर कृषी पाटबंधारे आणि विद्युतशक्ती यावर देण्यात आले होते. दुसऱ्या पंचवार्षीक योजनेत औद्योगिकरणावर भार देण्यात आला होतो. सोबतच मुलभूत उद्योगावर भर देण्यात आला होता. याशिवाय जास्त रोजगार निर्माण करणे ही या योजनेचे उदिष्ट होते. या दृष्टीने आयोगाचा आर्थिक धोरणाचा ठराव १९५६ महत्वाचा ठरला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा प्रमुख उद्देश हा समाजाचा स्वत:हरून विकास व्हावा व त्याकरिता समाजाने पावले उचलावीत हा होता. कृषी उत्पादनात वाढ करणे. धान्य उत्पादनाला स्वयंपूर्णता आणने हा योजनेचा मूळ उद्देश असल्याचे दिसून येते. तसेच पोलाद, लोखंड सारख्या मुलभूत उद्योग-धंद्याचा जलद विकास घटवून आणणे ही या योजनेचा हेतू होता. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे ही या योजनेचा उद्देश असल्याचे आढळून येते.

**संदर्भसूची :**


१. राजकीय विचारवंत - भा.ल. भोळे

२. राजकीय विचारांचा इतिहास - डॉ. ना. या. डोळे

३. आधुनिक भारतीय विचार - दि. का. गर्दे

४. भारतीय राजकीय विचार - प्रा. बी.बी. पाटील

५. भारतीय राजकीय विचार - प्रा. विलास पाटील

६. अर्थसंवाद जानेवारी-मार्च २०१५/खंड ३८ अंक

७. भारतीय राजकीय विचारवंत - कृ. दि. बोराळकर

८. भारतीय राजकीय विचारवंत - प्रा. आर. जी. मुळीक

9. Mordern Indian Political Thought - V.P.Varma

10. The Stste and Government in Ancient India - Dr. A.S.Altekar

11. Indian Political Thinking Jawahrlal Nehru


330

Co-Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya



Scanned by TapScanner